प्रति,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,

वाशी पोलिस स्टेशन,

3XCV+XW5, MGM ,

हॉस्पिटलजवळ, आत्मशांती सोसायटी,

सेक्टर 3, वाशी, नवी मुंबई, महाराष्ट्र.

वाशी, नवी मुंबई,

400703.

विषय: जीवे मारण्याची धमकी मिळाल्याबाबत तक्रार.

महोदय/महोदया,

मी, संतोष वासुदेव जोशी, वय : 54, राहणार : डी हेरिटेज CHS Ltd, D:3, 1st Floor, Room No. 12, C-Wing, Opp. Tanishq Jwellers, Vashi, Navi Mumbai 400703, येथे माझी पत्नी सुवर्णा जोशी आणि मुलगा ओंकार जोशी यांच्या समवेत राहत आहे. सदर सोसायटी वर सेक्रेटरी म्हणून गेली 10 वर्ष काम पहात आहे, सदर सोसायटी मध्ये अध्यक्ष म्हणून श्री. महादेव डुंबरे काम पाहत आहेत तसेच खजिनदार या पदावर राजेंद्र पारखे आहेत.

डी हेरिटेज CHS Ltd या सोसायटी चे पुनर्बांधणी चे कायदेशीर कामकाज सध्या चालू आहे, या विषयी मॅनेजिंग कमिटीच्या मीटिंग {PMC} प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट तसेच बिल्डर नेमणुकी विषयी चालू असतात. या प्रत्येक मीटिंग मध्ये मॅनेजिंग कमिटीचे सर्व सभासद आणि राजेंद्र पारखे हे सहभागी असतात. कोणताही ठराव संमत झाल्यावर हजर असलेल्या मॅनेजिंग कमिटी सभासदांच्या सह्या मिनिट्स बुक वर घेतल्या जातात. राजेंद्र पारखे यांच्या सह्या सुद्धा या मिनिट्स ग्रुप वर आहेत.

परंतु गेल्या काही महिन्यात राजेंद्र पारखे हा पुनर्बांधणी प्रक्रियेमध्ये अडचणी अडथळे आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सोसायटीला 54 ते 55 वर्षे झालेली आहेत. नवी मुंबई महानगरपालिका यांनी धोकादायक इमारती म्हणून सोसायटीला दोन नोटीस आधीच दिलेल्या आहेत. सदर सोसायटीला सोसायटी बनण्यासाठी 51% पेक्षा जास्त लोकांच्या संमती प्राप्त झाल्या आहेत. या सोसायटीच्या इमारती अत्यंत जीर्ण अवस्थेत उभे असून कोणत्याही क्षणी कोणतीही दुर्घटना होऊ शकते याचा विचार करून मॅनेजिंग कमिटी ने या सोसायटीचे पुनर्बांधणीचे काम चालू केले आहे

राजेंद्र पारखे हा नेहमीच सगळ्या बाबतीत विरोध दर्शवित असतो सगळं काही कायदेशीररित्या चालू असताना तो इतर सभासदांना रात्री बे रात्री मोबाईलवर कॉल करून हे डेव्हलपमेंट थांबवण्यासाठी सांगत असतो. श्री इमरान काझी, संदीप गायकवाड आणि मंगेश खापरे या मॅनेजिंग कमिटीच्या सभासदांनी माझ्याकडे तसेच अध्यक्ष श्री महादेव डुंबरे यांच्याकडे राजेंद्र पारखे यांचा तक्रारी केलेल्या आहेत. यासाठी अध्यक्ष श्री महादेव डुंबरे आणि मी त्यांना या बाबत विचारणा केल्याचा राग येऊन त्याने अध्यक्ष श्री महादेव डुंबरे यांचा समोर मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे तसेच इतर सभासदांच्या समोर राजेंद्र पारखे हे नेहमीच मला मारणार असल्याचे बोलत असतात. परंतु एवढे दिवस आम्ही राजेंद्र पारखे यांच्या या गोष्टींकडे दुर्लक्ष केले होते. अध्यक्ष श्री महादेव डुंबरे यांनी राजेंद्र पारखे यांना त्यांचा या कृत्यांमुळे बऱ्याच वेळा त्याला समजही दिलेली आहे.

याच राजेंद्र पारखे यांनी "मी आणलेल्या वकिलांकडून डेव्हलपमेंट पुनर्बांधणी प्रक्रिया समजावून घ्या असं सांगून दिनांक 26 मे 2025 रोजी सायंकाळी साडेसहा वाजता एन एम एस ए ,पहिला माळा रूम नंबर 14 ,वाशी , नवी मुंबई येथे मीटिंग आयोजित करण्यास अध्यक्ष यांना सांगितले. या मीटिंगमध्ये पुनर्बांधणी प्रक्रियेविषयी संपूर्ण बोलणे झाल्यावर माझी पत्नी सुवर्णा जोशी यांनी जेव्हा बोलण्यास सुरुवात केली तेव्हा राजेंद्र पारखे यांनी तिच्या वर ओरडून मोठ्याने का बोलता असं अत्यंत असभ्य आणि उर्मट भाषेचा वापर केला. तेव्हा मी त्यांना नीट बोला अशी विनंती केली परंतु राजेंद्र पारखे यांनी माझ्या अंगावर तिथे असणारी खुर्ची उचलून मारायचा प्रयत्न केला तेव्हा इतर सभासदांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. माझी पत्नी सुवर्णा जोशी हिने हिने जेव्हा राजेंद्र पारखेला "यापूर्वी तू माझ्या नवऱ्याला जिवे मारण्याची धमकी दिली आहेस "याची विचारणा केली तेव्हा त्याने मी असं बोललो नाही असं खोटं सांगितले आहे". परंतु या धमकी विषयी इतर सभासद तसेच अध्यक्ष महादेव डुंबरे यांनी राजेंद्र पारखे त्यांच्या समोर असं बोलल्याचे सांगितले आहे.

सदर मीटिंगचे रेकॉर्डिंग झालेले आहे परंतु राजेंद्र पारखे यांनी या मीटिंगचे रेकॉर्डिंग असलेला पेन ड्राईव्ह परस्पर रेकॉर्डिंग केलेल्या व्यक्तीकडून घेतला आहे असे समजले आहे. अध्यक्ष श्री महादेव डुंबरे यांनी रेकॉर्डिंग केलेल्या पेन ड्राईव्ह सोसायटी ऑफिस मध्ये जमा करा अशी विनंती राजेंद्र पारखे यांना केलेली आहे परंतु आज पर्यंत राजेंद्र पारखे यांनी सदर मीटिंगचे रेकॉर्डिंग असलेला पेन ड्राईव्ह जमा केला नाही. तसेच रेकॉर्ड करणारा वीरेन अंबादास तोडकर या व्यक्तीला आम्ही या बाबत विचारणा केली असता त्याने सदर रेकॉर्डिंग राजेंद्र पारखे यांना देऊन delet केल्याचे सांगितले. राजेंद्र पारखे यांनी मीटिंगमध्ये केलेले गैरवर्तन हे सदर रेकॉर्डिंग मध्ये असल्यामुळे राजेंद्र पारखे यांनी रेकॉर्डिंग असलेला पेन ड्राईव्ह अद्यापही सोसायटी ऑफिसमध्ये दाखल केलेला नाही तसेच विरेन अंबादास तोडकर या व्यक्तीने काहीही सोसायटीला न कळवता त्याच्याकडे असणारे रेकॉर्डिंग डिलीट केल्याचे सांगितले आहे या दोन्ही लोकांची तक्रार मी सेक्रेटरी म्हणून आपणास देत आहे.

महोदय, अध्यक्ष श्री महादेव डुंबरे तसेच मी आमचे काम अत्यंत पारदर्शक रित्या करीत आहे याची जाणीव मॅनेजिंग कमिटी मधील सर्व सदस्य तसेच सोसायटीतील इतर सभासद यांना माहित आहे. या साऱ्यांचा अध्यक्ष श्री महादेव डुंबरे आणि मला असलेला पाठिंबा आहे. यामुळे राजेंद्र पारखे यांना त्यांची दूषित कार्य साध्य करता येत नाही आहेत. त्यामुळे त्यांचा राग हा माझ्यावर असल्याने त्यांनी मला मारण्याची धमकीं दिली आहे.

वरील सोसायटीमध्ये मी माझ्या कुटुंबासहित राहत आहे. राजेंद्र पारखे याचे येणे जाणे सदर सोसायटीमध्ये असते या धमकीमुळे मी तसेच माझे कुटुंबीय मानसिक दडपणाखाली आहे. मला माझ्या तसेच माझ्या कुटुंबाच्या जीविताची भीती वाटत आहे. सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून श्री राजेंद्र पारखे तसेच विरेन अंबादास तोडकर यांच्या विषयी सदर मीटिंग चे रेकॉर्डिंग म्हणजेच पुरावे नष्ट करण्याची भीती असल्याने मी आपणांसमोर या दोघांची तक्रार करीत आहे.

तरी, आपणास नम्र विनंती आहे की, आपण या प्रकरणाची गंभीर पणे दखल घ्यावी आणि संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) मध्ये, कलम 351 अंतर्गत आणि भारतीय दंड संहिता (IPC) मध्ये, कलम 506 "जीवे मारण्याची धमकी" दिल्या बाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. मी आपल्याला या प्रकरणात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे.

आपला विश्वासू,

संतोष वासुदेव जोशी

मोबाईल नंबर: 9820747306

jsantosh0779@gmail.com

**राजेंद्र पारखे**,

पत्ता: Fam Co-Operative Housing Society,

Kalash Udyan, Sector 11, Koparkhairane,

Navi Mumbai, 400709,

Contact No. 9867261645.

वीरेन अंबादास तोडकर

Contact No. 9004919005